शुक्रवार, दि. २६ डिसेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १२१ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जविघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### जालना निवडणूक: आचारसंहिता भंगावर प्रशासनाचा 'वॉच'

## आत्तापर्यंत ५७ लाखांहून अधिकचा मुद्देमाल जप्त

### उमेदवारांच्या अनधिकृत जनसंपर्क कार्यालयांवर होणार गुन्हे दाखल; परवानगींसाठी 'एक खिडकी' सुविधा

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ ची प्रक्रिया निर्भय आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. निवडणूक कालावधीत आदर्श आचारसंहितेचा कोणताही भंग खपवून घेतला जाणार नाही; उल्लंघन करणाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, असा कडक इशारा निवासी जिल्हाधिकारी तथा आचारसंहिता कक्ष प्रमुख श्री. शशिकांत हदगल यांनी दिला आहे.

**प्रचार कार्यालयांसाठी 'एक खिडकी' सुविधा**

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, उमेदवारांना प्रचारासाठी तात्पुरती कार्यालये, रॅली, सभा, मिरवणूक, लाऊडस्पीकर, वाहन परवानगी, झेंडे आणि बॅनर यांसाठी महानगरपालिका कार्यालय येथे प्रभाग क्रमांक ४,५,६१०,११,१२ आणि तहसील कार्यालय येथे प्रभाग क्रमांक १,२,३,७,८,९,१३,१४,१५,१६ करिता 'एक खिडकी परवानगी कक्ष' स्थापन करण्यात आला आहे. उमेदवारांनी सर्व आवश्यक परवानग्या याच कक्षातून घेणे बंधनकारक आहे.

**अनधिकृत बॅनर व चिन्हांवर कारवाईचा बडगा**

अनेक ठिकाणी उमेदवारांच्या अस्तित्वात असलेल्या कार्यालयांवर पक्षाची चिन्हे, नावे आणि झेंडे विनापरवाना आढळत आहेत. महानगरपालिकेच्या स्वच्छता निरीक्षकांमार्फत अशा साहित्यावर कारवाई सुरू करण्यात आली आहे. यापुढेही विनापरवाना नाव किंवा चिन्हांचा वापर आढळल्यास संबंधित उमेदवारावर थेट गुन्हा दाखल केला जाईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**आचारसंहिता अंमलबजावणी: १० दिवसांतील कारवाईचा अहवाल**

दिनांक १५ ते २४ डिसेंबर २०२५ या कालावधीत विविध भरारी पथकांनी केलेल्या कारवाईचा तपशील खालीलप्रमाणे आहे:

| अ.क्र. | कारवाईचा प्रकार | गुन्हे/केसेस | जप्ती (मुद्देमाल) | जप्ती किंमत (अंदाजे) |

मद्य जप्तीच्या ०८ आठ कारवायात २४० लिटर मद्याहस १,२६,५६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, गुटखा जप्ती एका कारवाईत ३९२ किलो रु ४७,४८,५९० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अंमली पदार्थ (गांजा) एका कारवाईत १८ किलो रु ९,००,००० किमतींचा मुद्देमाल, अवैध अग्नीशस्त्रे व काडतुसे एका कारवाईत ०२ नग रु २,८५,००० किमतीचा मुद्देमाल व तलवार जप्ती तीन कारवायांमध्ये ३ नग सह रु ३,८०० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच, प्रतिबंधक कारवाई अंतर्गत ४२ केसेस दाखल करण्यात आल्या असून, १८२ परवानाधारक शस्त्रे पोलीस ठाण्यात जमा करून घेण्यात आली आहेत.

**तक्रारीसाठी टोल फ्री क्रमांक**

आचारसंहिता भंगाबाबत नागरिकांना तक्रार नोंदवण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने ०२४८२-२२३१३२ हा टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून दिला आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी नागरिकांनी आणि उमेदवारांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन आचारसंहिता कक्षातर्फे करण्यात आले आहे.

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६

## दोन दिवसांत १५०० पेक्षा अधिक अर्जांची विक्री; प्रभाग १३ मधून पहिले नामनिर्देशन पत्र दाखल

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी नामनिर्देशन पत्र (उमेदवारी अर्ज) विक्री आणि स्वीकृती प्रक्रियेला वेग आला आहे. दिनांक २३ डिसेंबरपासून सुरू झालेल्या या प्रक्रियेत इच्छुकांचा मोठा प्रतिसाद लाभत असून, पहिल्या दोन दिवसांतच अर्जांच्या विक्रीने दीड हजारांचा टप्पा गाठला आहे.

निवडणूक प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, आज दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी शहरातील एकूण १ ते १६ प्रभागांमधून ६९२ नामनिर्देशन पत्रांची विक्री झाली. दिनांक २३ आणि २४ डिसेंबर अशा दोन दिवसांचा एकत्रित विचार केल्यास, आतापर्यंत एकूण १,४९६ अर्जांची विक्री झाली आहे.

विशेष म्हणजे, आज दिनांक २४ डिसेंबर रोजी निवडणुकीचे पहिले नामनिर्देशन पत्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे प्राप्त झाले आहे. प्रभाग क्रमांक १३ 'अ' (नागरिकांचा मागास प्रवर्ग - महिला) मधून एक उमेदवारी अर्ज दाखल झाला असून, या अर्जासोबतच प्रत्यक्ष अर्ज स्वीकृती प्रक्रियेचा श्रीगणेशा झाला आहे. दिनांक २५ डिसेंबर २०२५ रोजी ख्रिसमस (नाताळ) निमित्त सार्वजनिक सुट्टी असल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयामार्फत नामनिर्देशन पत्र विक्री तसेच स्वीकृतीचे काम काज बंद होते.

युवा आदर्श

**व्हिडिओ ...**

अश्लील व्हिडिओ
होतो एखादं सादर
क्षणार्धात मनातला
निखळू पडे आदर
हातपाय उघडे पडे
सरकून जाते चादर
उघडी तोंडे बोलती
सगळे करे अनादर
सत्य असत्य पोटात
बाहेर येतो जलोदर
काही बाही कुणीही
बोलू लागतात अधर
चारित्र्य अति अमोल
करावी नेहमी कदर
चेहरा दिसे रेखीव
सावरतो जसा पदर
लाज राही पडद्यात
जीवन होईलं सुंदर
नीतळ निरामयवृत्ती
सामान्यांत सिकंदर
रंगबिरंगी बातम्यात
चालू राहतात सदर
उधळे सर्वत्र चिखल
नाचू लागतात बंदर
वावड्या प्रिय सर्वां
कोण पाहे अगोदर
नकोनको ती अफवा
राहते सहज गरोधर

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

**झाडे लावा झाडे जगवा**

## माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांना मातृशोक

### द्रौपदाबाई अंबेकर यांचे वृद्धापकाळाने निधन

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील राजाराम नगर येथील रहिवासी स्व. द्रौपदाबाई राजारामजी अंबेकर (वय ९३) यांचे गुरुवार रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने अंबेकर कुटुंबावर शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



स्व. द्रौपदाबाई अंबेकर या शांत, धार्मिक व कुटुंबवत्सल स्वभावाच्या होत्या. त्यांनी आयुष्यभर कुटुंबसंस्कार, सामाजिक सलोखा आणि धार्मिक मूल्यांची जोपासना केली.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली कुटुंबातील पुढील पिढी घडली असून त्या परिसरातही आदराचे स्थान मिळवून होत्या.

त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, नातवंडे व आप्तस्वकीय असा मोठा परिवार आहे. जालना शहराचे माजी नगराध्यक्ष तसेच शिवसेनेचे संपर्कप्रमुख भास्करराव अंबेकर यांच्या त्या मातोश्री होत.

स्व. द्रौपदाबाई अंबेकर यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार कुटुंबीय व नातेवाईकांच्या उपस्थितीत करण्यात आले. त्यांच्या निधनाबद्दल विविध राजकीय, सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांनी अंबेकर कुटुंबीयांची भेट घेऊन शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत.

## जालना जिल्ह्यात नाताळ उत्साहात साजरा

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात ख्रिसमस (नाताळ) सण मोठ्या श्रद्धा, भक्ती व आनंदाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. जुना जालना, बेथलेहेम गांव व जिल्ह्यातील विविध चर्चमध्ये विशेष प्रार्थना, भक्ती व आराधना कार्यक्रमांचे आयोजन नाताळानिमित्त करण्यात आले होते.

नवीन जालना येथील मिशन हॉस्पिटल परिसरातील क्राईस्ट चर्च कॅथेड्रल जुना जालना भागातील नुतन वसाहत येथील टॉम डॉप्सन मेमोरियल चर्च तसेच बेथलेहेम येथील चर्चमध्ये ख्रिसमस निमित्ताने भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. यावेळी चर्चमध्ये विशेष भक्ती व आराधना घेण्यात आली. प्रभू येशूच्या जन्मावर आधारित उपदेश देण्यात आला. या उपदेशातून प्रेम, क्षमा, दया, नम्रता, सत्याचा मार्ग, मानवसेवा व शांततेचा



संदेश देण्यात आला. प्रभू येशूचा जन्म हा संपूर्ण मानवजातीसाठी आशा, तारण व नवजीवनाचा संदेश देणारा असल्याचे सांगण्यात आले.

नविन जालना येथील क्राईस्ट चर्चमध्ये रेव्ह. भालेराव यांनी भक्ती घेतली. यावेळी धार्मिक गीतांचे सादरीकरण करण्यात आले. तर जुना जालना नुतन वसाहात भागातील टॉम डॉप्सन मेमोरियल चर्चमध्ये रेव्ह. बि.बि. कांबळे यांनी नाताळाची भक्ती घेतली. चर्चमध्ये टॉम डॉप्सन तरुण मंडळाने केलेली सजावट विशेष लक्षवेधी ठरली. ख्रिसमस ट्री, आकर्षक विद्युत रोषणाईमुळे संपूर्ण परिसर उजळून निघाला होता.

जालना पान २ वर

### मोफत थायरॉईड निदान शिबिरात ६४ जणांची तपासणी

## वेळीच तपासणी केल्यास थायरॉईडवर नियंत्रण शक्य -डॉ. राजेश सेठिया



**जालना । प्रतिनिधी -** जालना तेरापंथ महिला मंडळाच्या पुढाकारातून सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्ट व रोटरी क्लब जालना रेनबो यांच्या सहकार्याने शहरातील डॉ. राजेंद्र प्रसाद मार्गावरील रुबी हॉस्पिटलमध्ये दि. २३ डिसेंबर रोजी मोफत थायरॉईड निदान शिबिरात ६४ जणांची तपासणी करण्यात आली.

शिबिराचे उद्घाटन सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष पन्नालाल बगडिया यांच्या हस्ते व प्रकल्प प्रमुख डॉ. राजेश सेठिया यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी डॉ. राजेश सेठिया यांनी थायरॉईड आजाराबाबत उपस्थित नागरिकांना सखोल माहिती देताना सांगितले की, थायरॉईड ही समस्या आज मोठ्या प्रमाणावर वाढत असून महिलांमध्ये तिचे प्रमाण अधिक आहे. थकवा, वजनातील बदल, केस गळणे, चिडचिड, हृदयाचे ठोके वाढणे ही त्याची प्रमुख लक्षणे असून वेळेवर तपासणी व योग्य उपचार केल्यास या आजारावर पूर्णपणे नियंत्रण मिळवता येते. आरोग्याबाबत दुर्लक्ष न करता नियमित तपासणी करण्याचे आवाहन त्यांनी केले. पन्नालाल बगडिया म्हणाले की, सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने वर्षभरात १० हजार थायरॉईड चाचण्या करण्याचा मानस असून, डॉ. सेठीया यांच्या नेतृत्वात ठिकठिकाणी निशुल्क तपासणी शिबिरे आयोजित केली जात आहेत. आजच्या धावपळीच्या जीवनात आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. अशा निशुल्क आरोग्य शिबिरांमुळे सर्वसामान्य नागरिकांपर्यंत तपासणी व जनजागृती पोहोचते. समाजासाठी उपयुक्त असलेले हे उपक्रम पुढेही सातत्याने राबविण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

यावेळी तेरापंथ सभेचे अध्यक्ष ड. अनिल संचेती, तेरापंथ महिला मंडळाच्या अध्यक्ष ज्योतिबाला सेठिया, मंत्री नेहा बोथरा, सल्लागार उर्मिला पीपाडा, उपाध्यक्षा अनिता जोगड, सीमा सेठिया, कोषाध्यक्षा कमलाबाई सेठिया, उपमंत्री वंदना पीपाडा यांच्यासह सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

प्रारंभी साधना सेठिया यांनी पान २ वर

## श्रध्येय अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त भाजपा जिल्हा कार्यालयात अभिवादन




**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालय जालना येथे माजी मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये श्रध्येय अटलबिहारी यांची आज दि. २५ डिसेंबर रोजी अभिवादन करून जयंती साजरी करण्यात आली. यावेळी माजी आ.कैलासजी गोरंटयाल, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, माजी जिल्हाध्यक्ष अशोक पांगारकर, सतीश जाधव, रिपाई नेते ब्रम्हानंद चव्हाण, प्रदेश निमंत्रित सदस्य विजय कामड, विमलताई आगलावे, युवानेते अक्षय गोरंटयाल आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी रावसाहेब पाटील दानवे यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले कि, मी स्वत पंधरा वर्ष अटलजींच्या सोबत संसदे मध्ये काम केले, अटलजींची काम करण्याची पद्धत अतिशय संवेदनशील होती, त्यांनी सभागृहात त्यांच्या भाषणामध्ये अनेक जुने उदाहरणे देत असे, ते पंतप्रधान पदावर असताना सुद्धा ते कवी व लेखक असल्या कारणाने अनेक कविता त्यांनी लिहिल्या, त्यांच्या नेतृत्वामध्ये ६ एप्रिल १९८० रोजी भारतीय जनता पार्टी ची स्थापना झाली व भारतीय जनता पार्टी चे मुंबई येथील वांद्रे परिसरातील रेक्लमेशन मैदानावर पहिले राष्ट्रीय अधिवेशन घेण्यात आले, त्या अधिवेशनात मी पूर्ण वेळ उपस्थित होतो. स्थापणे नंतर १९८५ च्या झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टी चे देशात दोन खासदार निवडून आले, त्यावेळी सभागृहामध्ये काँग्रेस नेते देशात राज्य करणार कोण ज्यांचे संसदेत खासदार दोन नारा देऊन अपमानित करण्याचा प्रयत्न करीत असे त्याचवेळी अटलजीनी सभागृहात अतिशय खंबीरपणे उभे राहून सभागृहात उत्तर दिले एक दिवस असा येईल आमचे दोन चे दोनशे खासदार निवडून येतील आणि त्या दिवशी आम्ही सत्तेत असू आणि काँग्रेस विरोधात असेल असे उत्तर देऊन पक्षाने अटलजींच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टी चा संघटनात्मक पाया अतिशय मजबूत रचल्याने देशात अटलजींच्या नेतृत्वात सरकार स्थापन झाले व सन २०१४ मध्ये पान २ वर

## संपादकीय पान

# थोर विचारवंत, व्यासंगी व्यक्तिमत्व...



भारताचे माजी पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग यांची आज पुण्यतिथी. दोन वर्षापूर्वी २६ डिसेंबर २०२४ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत आणि व्यासंगी व्यक्तिमत्त्व हरपला. त्यांनी देशासाठी जे योगदान दिले देश कधीही ते विसरणार नाही. त्यांच्या निधनाने भारताची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे. आज भारताची अर्थव्यवस्था जगातील सर्वात वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था मानली जाते. याचे सर्व श्रेय डॉ मनमोहन सिंग यांनाच जाते कारण तीस बत्तीस वर्षापूर्वी ते देशाचे अर्थमंत्री असताना देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी त्यांनी जे क्रांतिकारी निर्णय घेतले त्यामुळेच देशाची अर्थव्यवस्था सुदृढ झाली आहे. डॉ मनमोहन सिंग हे रूढ अर्थाने राजकारणी नव्हते तरीही त्यांनी समर्थपणे दहा वर्ष देशाचे नेतृत्व केले. त्यांनी देशासाठी दिलेले योगदान खूप महत्वाचे आहे. २६ सप्टेंबर १९३२ रोजी एका गरीब कुटुंबात डॉ मनमोहन सिंग यांचा जन्म झाला. ते लहान असतानाच त्यांचे मातृ छत्र हरपले. घरची परिस्थिती हालाखीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. पंजाब विद्यापीठातून आपले उच्च शिक्षण पूर्ण केल्यावर त्यांनी १९५७ साली केंब्रिज विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयातून पहिल्या श्रेणीत पदवी मिळवली. त्यानंतर त्यांनी १९६२ साली ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या नफिल्ड महाविद्यालयातून अर्थशास्त्र विषयात डी फिल ही पदवी संपादन केली. उच्च शिक्षण घेऊन ते मायदेशात परतल्यावर त्यांनी पंजाब विद्यापीठ तसेच दिल्ली स्कूल ऑफ इकोनॉमिक्समध्ये प्राध्यापक म्हणून सेवा केली. अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. एक विद्यार्थीप्रिय प्राध्यापक अशी त्यांची ओळख होती. याच दरम्यान त्यांनी युएनसिटीडी सचिवालयात त्यांनी काम पाहिले. अर्थशास्त्रातील विद्वान व्यक्ती अशी त्यांची ख्याती जगभर पसरू लागली त्यामुळे १९७१ साली त्यांना वाणिज्य मंत्रालयाचे आर्थिक सल्लागार ही जबाबदारी देण्यात आली. पुढील वर्षी म्हणजे १९७२ साली त्यांची अर्थ मंत्रालयात प्रमुख आर्थिक सल्लगार म्हणून नेमणूक झाली. अर्थ विभागाचे प्रमुख सल्लागार म्हणून त्यांची कामगिरी उल्लेखनीय राहिली. पुढे त्यांनी अर्थ मंत्रालयाचे सचिव, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, पंतप्रधानांचे आर्थिक सल्लागार, विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष अशा महत्वाच्या पदावर त्यांनी काम केले. १९८७ ते १९९० या काळात त्यांनी जिनिव्हा येथील साऊथ कमिशनचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. १९९० पासून भारतीय राजकारणात अनेक मोठ्या घडामोडी घडत होत्या. राजकारण अस्थिर झाले होते. विश्वनाथ प्रताप सिंग यांचे सरकार पडले होते. चंद्रशेखर हे भारताचे पंतप्रधान बनले होते. भारताची अर्थव्यवस्था बिकट बनली होती. देश चालवण्यासाठी सरकारकडे पैसे नव्हते सरकारी तिजोरीत ठणठणाट होता म्हणून पंतप्रधान चंद्रशेखर यांनी देशाचे हजारो टण सोने जागतिक बँकेकडे गहाण ठेवले होते. केवळ भारतच नव्हे तर संपूर्ण जगातच आर्थिक मंदी आली होती. अनेक देश डबघाईला आले होते अशातच काँग्रेसने चंद्रशेखर यांचा पाठिंबा काढून घेतल्याने लोकसभेच्या निवडणुका लागल्या होत्या. निवडणूक प्रचार दरम्यानच राजीव गांधी यांची हत्या झाल्याने काँग्रेसचे सूत्रे पी व्ही नरसिंह राव यांच्याकडे आली. त्या निवडणुकीत काँग्रेसने सर्वाधिक जागा जिंकल्याने नरसिंह राव पंतप्रधान बनले. पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेताच कॅबिनेट सचिव नरेश चंद्र यांनी त्यांना आठ पानांचा अहवाल दिला. या अहवालात देशाची आर्थिक स्थिती अत्यंत वाईट असल्याचे नमूद करण्यात आले होते. अशा परिस्थितीत राव यांना अशा चेहऱ्याची गरज होती जो आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि त्यांच्या विरोधकांना भारत आता जुन्या मार्गावर जाणार नाही असा संदेश देऊ शकेल. त्यांनी त्यावेळी त्यांचे सल्लागार पी सी अलेक्झांडर यांना विचारले की अर्थ मंत्रालयासाठी आंतरराष्ट्रीय मान्यता असलेल्या व्यक्तींचे नावे सुचवा तेंव्हा पी सी अलेक्झांडर यांनी आय जी पटेल व डॉ मनमोहन सिंग यांची नावे सुचवली. आय जी पटेल यांची आई आजारी असल्याने ते भारतात येऊ शकणार नाही मात्र डॉ मनमोहन सिंग यांना संपर्क केल्यास देशहीतासाठी ते अर्थमंत्री होतील असे पी सी अलेक्झांडर यांनी पंतप्रधानांना सांगितले. लगेचच नरसिंह राव यांनी डॉ मनमोहन सिंग यांच्याशी संपर्क केला आणि तुम्ही माझ्या मंत्रिमंडळात अर्थमंत्री होताल का ? असे विचारले. मनमोहन सिंग यांनी त्यास होकार दिला आणि डॉ मनमोहन सिंग भारताचे अर्थमंत्री बनले. अर्थमंत्री म्हणून त्यांनी अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी त्यांनी खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण धोरण आणले. अर्थमंत्री म्हणून त्यांनी देशाची अर्थव्यवस्था सुधारलीच नाही तर ती वेगवान केली. त्या काळात डॉ मनमोहन सिंग यांना जागतिक पातळीवर सर्वोत्कृष्ट अर्थमंत्री म्हणून संबोधले जात असे. त्यांनी जागतिक बँकेकडे गहाण ठेवलेले सोने परत आणले. देशाच्या तिजोरीत भर घातली. देशात परदेशी गुंतवणूक आणली त्यामुळे देशाची अर्थव्यवस्था तर सुधारलीच पण तरुणांना रोजगार देखील मिळाला. त्यांच्या उदारीकरणाच्या धोरणाला जगाने मान्यता दिली म्हणूनच त्यांना जागतिक उदारीकरणाचे जनक असे म्हणतात. १९९६ साली काँग्रेसचे सरकार गेल्यावर ते राज्यसभेत विरोधी पक्षनेते बनले. मे २००४ साली झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला बहुमत मिळाले त्यावेळी सोनिया गांधी याच देशाच्या पंतप्रधान होतील असे सर्वांना वाटले पण सोनिया गांधींनी आपला आतला आवाज ऐकून पंतप्रधानपद नाकारले आणि डॉ मनमोहन सिंग यांची पंतप्रधानपदी निवड केली. त्यांच्या पंतप्रधानपदाच्या काळातही त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले . देशातील एकही व्यक्ती उपाशी झोपू नये म्हणून त्यांनी अन्न सुरक्षा सारखे महत्वाचे विधेयक आणले. सर्वांना रोजगार मिळावे म्हणून त्यांनी मनरेगा योजना आणली. त्यांच्या पंतप्रधान काळात परराष्ट्राशी भारताचे सौहार्दाचे संबंध होते. त्यांच्याच काळात भारत आणि अमेरिका यांचे संबंध दृढ झाले. सर्वसामान्य जनतेच्या हिताचे अनेक निर्णय घेतल्यानेच जनतेने त्यांना दुसऱ्यांदा पंतप्रधान बनण्याची संधी दिली. २००४ ते २०१४ असे सलग दहा वर्ष ते भारताचे पंतप्रधान होते. सलग दहा वर्ष देशाचे पंतप्रधान राहूनही ते कायम नम्र आणि विनयशील राहिले. अहंकाराचा लवलेशही त्यांना शिवला नाही. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. अर्थशास्त्रावर आधारित ग्रंथ लीहले. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. त्यांना अनेक विद्यापीठांनी मानाची डॉक्टरेट दिली. देशाचा दुसरा सर्वोच्च पुरस्कार पद्मविभूषण त्यांना प्राप्त झाला. त्यांच्या निधनाने देशाने एक महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत, व्यासंगी व्यक्तिमत्त्व, अभ्यासक आणि थोर देशभक्त गमावला आहे. त्यांच्या कामाप्रती असलेला व्यासंगी आणि शैक्षणिक दृष्टिकोन, जनसामान्यांसाठी असलेली उपलब्धता व विनम्र आचारणामुळे ते कायम स्मरणात राहतील. डॉ मनमोहन सिंग यांना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# 'अच्छे दिन'चे स्वप्न साक्षात उतरेल का...?

मराठी माणूस, मुंबई वाचवायची हे एकमेव लक्ष्य डोळ्यासमोर ठेवून ठाकरे बंधू महापालिका निवडणुकीत एकत्र आले आहेत. नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकीचा धुराळा खाली बसत नाही, तोच आता महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली. ठाकरे बंधू एकत्र येणार...येणार असे म्हटले जात होते, अखेर शिवसेना (ठाकरे) आणि मनसे युतीचा मुहूर्त ठरला. ठाकरे बंधूंनी एकत्र येण्याचे निश्चित केले. २० वर्षांची दरी या निवडणुकीच्या निमित्ताने किंवा सत्ताधारी भाजपमुळे मिटली असेही म्हटले तर वावगे ठरणार नाही. या दोन्ही सेना एकत्र येताना त्यांची एकवाक्यता 'मराठी माणूस' आणि 'मुंबई वाचवा' या शब्दांवरती झाली आहे. काँग्रेस त्यांच्यापासून दूर गेली असली तरी त्यांचाही नारा सत्ताधाऱ्यांपासून धारावी, मुंबईतील मोक्याच्या जागा आणि मुंबईकरांना वाचवा हाच आहे. 'अच्छे दिन'चे स्वप्न दाखवून सत्तेत आलेल्या भाजपच्या १०-११ वर्षानंतरच्या काळानंतर आता जनतेला या सत्ताधाऱ्यांपासून मराठी शाळा-जल-जंगल-जमीन आणि एकूणच माणसाला आवश्यक असणारी त्याची हक्काची जागा वाचवण्याची हाक का द्यावी लागत आहे.

मुंबईतीलच नाही तर राज्यातील मराठी शाळा वाचवण्याची हाक दिली जात आहे. एकीकडे मराठी भाषा अमृताहूनी गोड असे गोडवे गायचे आणि दुसरीकडे जिथे ही भाषा रुजेल, वाढेल, वृद्धिंगत होईल त्या शाळाच डम्प करायच्या. तिथे बुलडोजर फिरवून टॉवर उभे करायचे. आमची शाळा चोरीला गेली अशी तक्रार मुंबई पोलिसांत दाखल आहे. अजून किती गतीने मराठीची अवनती करायचा विचार आहे. कांजूर डम्पिंग ग्राऊंडच्या दुर्गंधीवर तोडगा काढण्याचे आदेश कोर्टाने सरकारला दिले आहेत. सर्वच गोष्टी या कोर्टाला का सांगाव्या लागत आहेत. कल्याणकारी राज्यामध्ये सत्ताधाऱ्यांनी ज्याममध्ये जनतेचं कल्याण आहे तेच करणं अपेक्षित असताना त्यासाठी मोर्चे, आंदोलनं आणि नंतर न्यायालयाचे दार ठोठावून, कायद्याचा बडगा उगारून का सांगावं लागत आहे. नाशिकमध्ये झाडं वाचवा म्हणत अबालवृद्धांना 'चिपको आंदोलन' करावं लागलं. विकासाची कुऱ्हाड ही पहिली झाडावर पडते आणि नंतर बुलडोजर जंगल सपाट करून आता डोंगरही भुईसपाट करायला निघाले आहेत. जल-जंगल-जमीन वाचवण्याची लढाई ही फक्त आता आदिवासींची राहिलेली नाही. शुद्ध हवा-पाणी मिळण्याची धडपड आता राजधानी दिल्लीपासून रत्नागिरीतील लोटे परशुराम परिसरापर्यंतच्या नागरिकांना करावी लागत आहे. इटलीतील मिटेनी एस.पी.ए. ही रासायनिक कंपनी महाराष्ट्रातील रत्नागिरीत दाखल झाली आहे. अत्यंत घातक रसायनांचे उत्पादन या कंपनीमार्फत होते. हे केमिकल्स मानवी शरीर आणि निसर्गात दीर्घकाळ टिकून राहतात. यामुळे कॅन्सर, हार्मोनल आजार, वंध्यत्व यांसारखे गंभीर धोके वाढल्याचे स्पष्ट झाल्यानतंर इटलीतील न्यायालयाने कंपनीच्या ११ अधिकाऱ्यांना १४१ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली.



**श्री. शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**कागल-कोल्हापूर**

एवढी जीवघेणी कंपनी गुपचूप आपल्या महाराष्ट्रात रत्नागिरीत येते. यामुळे वशिष्ठी नदी, कोकणातील भूगर्भातील पाणी आणि आपल्या माणसांचं जीवन धोक्यात जाणार असल्याची आपल्याला कल्पनाही नसावी, हे किती भयानक आहे. याचे दुष्परिणाम दिसल्यावरच आम्ही कोकण वाचवा म्हणणार आहोत का?

आज दिल्ली वाचवा, हिमालय वाचवा अशी हाक दिली जात आहे.अरवली पर्वतरांगा नष्ट करण्याचे घाटत आहे. यामुळे फक्त राजस्थान, हरियाणा, दिल्लीचीच वाळू होणार नाही तर हिमालयापर्यंत वाळू उडून जाईल. हिमालयावर वाळूचे थर जमा झाले तर बर्फ मोठ्या प्रमाणात वितळून महापुराच्या चक्रात अडकलेल्या बिहारवर नेमके कोणते संकट येईल, हे सांगणेही कठीण आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे उत्तर भारताचं पर्यावरण संकटात आलं आहे. गुजरात, राजस्थान आणि हरियाणामधील अरवली पर्वतरांगांमध्ये खाणींसाठी कोर्टाने परवानगी दिली आणि हे संकट उभं राहिलं आहे. हजारो वर्षांपासून असलेल्या या पर्वतरांगांची व्याख्या करण्यात आली आणि तिथे खाणींना रान मोकळे करून देण्यात आले. यामुळे वन्यजीव, जलवायू संकट आणि उत्तर भारताचाच वाळवंट होण्याची प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या संकटापासून वाचवा म्हणण्याची वेळ दिल्ली, राजस्थानसह एकूणच उत्तर भारतावर आली आहे. अरवली पर्वतरांगा जवळपास ६७० किलोमीटर लांब आहे. उत्तर भारताला त्यांनी थार वाळवंटापासून वाचवले आहे. सर्वोच्च न्यायालयाने खाण उद्योगांसाठी केलेल्या अरवलीच्या व्याख्येमुळे संपूर्ण आरवली पर्वतरांगा धोक्यात आल्या आहेत. जर अरवली पर्वतरांगा संपवून टाकण्यात आल्या तर मान्सून राजस्थानमध्ये न थांबता पूर्वेकडे जाईल. यामुळे राजस्थानमध्ये पर्जन्यमान कमी होईल. थर वाळवंट पूर्वेकडे सरकेल. डोंगररांगाच नसतील तर मान्सूनचे वारे न थांबताच पुढे निघून जातील. संपूर्ण उत्तर भारतात दुष्काळाची स्थिती निर्माण होईल. उत्तर भारताचे हवामानच बदलून जाईल. जंगल नष्ट झाले तर तिथले वन्यजीव, प्राणी, पक्षी कुठे जातील. या डोंगररांगांवर अवलंबून असलेले पर्यटन उद्योग, रोजगार आज आम्हाला वाचवा अशी हाक देत आहेत. सत्ताधाऱ्यांच्या ११ वर्षांच्या कार्यकाळानंतर वाचवा वाचवा हाक का द्यावी लागत आहे..?

# 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे नि तपोवनाचे वाढते तापमान'

संत तुकाराम महाराज यांच्या वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे या अभंगातून झाडे, वेली आणि जंगलातील प्राणी हे आपले सगेसोयरे, आपले कुटुंबीय आहेत. कारण ते आपल्याला जगण्यासाठी आवश्यक असलेला प्राणवायू, निवारा आणि अन्न देतात. ते आपले मित्र आहेत आणि त्यांच्यामुळेच एकांतवास आणि आत्मचिंतन शक्य होते, असे संत तुकारामांनी म्हटले आहे. जो पर्यावरणाच्या रक्षणाचा आणि निसर्गाशी एकरूप होण्याचा संदेश देतो. तुकाराम महाराज म्हणतात की झाडे, वेली आणि वन्यजीव हे केवळ आजूबाजूचे घटक नाहीत, तर ते आपले सगेसोयरे आहेत, जे आपल्या जीवनासाठी आवश्यक आहेत. यातून वृक्षारोपण, जंगलसंपदा आणि पर्यावरणाचे रक्षण करण्याची शिकवण मिळते. जी छत्रपती शिवाजी महाराजांनीही 'गड तेथे आमराई' या घोषणेतून दिली. झाडे आणि पक्ष्यांच्या सुमधुर आवाजामुळे एकांत आवडतो, जिथे गुण-दोष न लागता मनाला शांती मिळते आणि आत्मचिंतन करता येते. सांगायचं तात्पर्य म्हणजे निसर्गातील सर्व घटकांना आपले मानून त्यांच्यासोबत प्रेमाने आणि आदराने राहण्याचा तसेच पर्यावरणाचे रक्षण करण्याचा संदेश देते.

वृक्षतोड आणि पर्यावरणाचा मुद्दा हा एक गंभीर जागतिक प्रश्न आहे, जिथे विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर होणारी झाडे तोडण्याने जैवविविधतेचा -हास होतो, हवामान बदल वाढतो, मातीची धूप होते, वन्यजीवांचा अधिवास नष्ट होते आणि स्थानिक पर्यावरणाचे संतुलन बिघडते, ज्यामुळे मानवी जीवन तथा संपूर्ण जीवसृष्टी धोक्यात येते. अनेकदा वृक्षारोपणच्या आश्वासनांनंतरही प्रत्यक्षात हे वृक्ष जगतातच असे नाही. म्हणून वृक्षतोडीचे परिणाम आणि उपाययोजनांवर गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे, असे अनेक अहवाल आणि घटनांमधून स्पष्ट होते.

वृक्षतोड आणि पर्यावरण यांचा खूप जवळचा संबंध आहे. वृक्षतोडीमुळे पक्षी, प्राणी आणि सूक्ष्मजंतू नष्ट होतात नि स्थानिक समुदायांचे विस्थापन होते. ज्यामुळे संपूर्ण परिसंस्थेवर नकारात्मक परिणाम होतो आणि पर्यावरणाचा समतोल बिघडतो. कार्बन डायऑक्साइड शोषून घेणारी झाडे कमी झाल्याने जागतिक तापमान वाढते म्हणजेच हवामानात बदल होते. मातीची गुणवत्ता आणि पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी होते आणि पाण्याचे चक्र बिघडते अर्थात पावसाचे प्रमाण कमी-जास्त होते आणि पाणीटंचाई निर्माण होऊ शकते. तसेच हवा आणि पाणी प्रदूषणात वाढ होते. यासाठी बेकायदेशीर वृक्षतोडीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर कायद्यांची अंमलबजावणी आवश्यक आहे. 'एक झाड तोडले तर दहा लावू' अशा आश्वासनांऐवजी लावलेली झाडे जगतील याची खात्री करणे, स्थानिक समुदायांना वृक्ष संवर्धनात सहभागी करून घेऊन जागरूक करणे, नैसर्गिक संसाधनांचा जपून वापर करणे आणि शाश्वत विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचे नुकसान टाळणे आवश्यक असते. वृक्षतोड आणि पर्यावरणाचा मुद्दा हा केवळ झाडे तोडण्याचा नसून, मानवाच्या भविष्याशी आणि पृथ्वीच्या अस्तित्वाशी जोडलेला एक गंभीर प्रश्न आहे, ज्यावर तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर नाशिकमधील तपोवन सध्या वृक्षतोड आणि पर्यावरण संवर्धनावरून सुरू असलेल्या वादाभोवती फिरत आहे, ज्यात पर्यावरणप्रेमींनी कुंभमेळा आणि सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या नावाखाली होणा-या वृक्षतोडीला विरोध केला आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही ही प्रक्रिया सुरू असून महापालिका प्रशासनावर दबाव आहे. तर दुसरीकडे प्रशासनाकडून पर्यायी रोपे लावणे आणि विकासाच्या नावाखाली जागा ताब्यात घेण्यावरून चर्चा सुरू आहे. म्हणजेच तपोवन हे सध्या पर्यावरणाचे रक्षण आणि विकासाच्या गरजा यांच्यातील संघर्षाचे केंद्र बनले आहे, जिथे वृक्षतोड, नदीची स्वच्छता आणि जमिनीच्या वापरावरून मोठा वाद सुरू आहे. ज्यामुळे तपोवन हे सद्यस्थितीत चर्चेत आहे.

सांडपाणी प्रक्रिया केंद्र आणि कुंभमेळ्याच्या नावाखाली झालेल्या वृक्षतोडीमुळे पर्यावरणप्रेमींनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून वृक्षतोडीच्या बदल्यात लावलेल्या रोपांची स्थिती, कपिला नदीची स्वच्छता आणि प्रशासनाकडून होणा-या कार्यवाहीवर लक्ष केंद्रित करून 'तपोवन वाचवा' मोहीम तीव्र झाली आहे. ज्यात स्थानिक नागरिक, विद्यार्थी आणि तज्ज्ञांचा सहभाग आहे. सांडपाणी प्रक्रिया केंद्रासाठी वृक्ष तोडण्यावरून पर्यावरणप्रेमी आणि प्रशासनात संघर्ष सुरू आहे. तर दुसरीकडे कपिला नदीची स्वच्छता, ऐतिहासिक संवर्धनाचे मुद्दे आणि प्रशासकीय घडामोडी तथा कुंभमेळ्याची तयारी यावरही लक्षवेध आहे.

पर्यावरणप्रेमींनी प्रशासनाला झाडे तोडण्याच्या निर्णयाबद्दल प्रश्न विचारले आहेत आणि वृक्षतोडीचा विरोध करत आहेत. या संदर्भात त्यांनी आयुक्तांना निवेदन दिले आहे. उच्च न्यायालयातही याचिका दाखल करण्यात आली आहे, ज्यामुळे परिस्थिती अधिक संवेदनशील झाली आहे. प्रशासनाकडून कुंभमेळ्याच्या तयारीच्या नावाखाली झाडे तोडल्याचा आरोप आहे, तर काही राजकीय नेते आणि पर्यावरणवादी संस्था यावर आवाज उठवत आहेत. कपिला नदीच्या स्वच्छतेच्या स्थितीबद्दलही पर्यावरणप्रेमी चिंता व्यक्त करत आहेत आणि यावर लक्ष देण्याची मागणी करत आहेत. तसेच तपोवन परिसरातील ऐतिहासिक वारसा आणि ठिकाणांचे संवर्धन करण्यावरही भर दिला जात आहे. तपोवन सध्या एका बाजूला विकासाच्या नावाखाली होणा-या वृक्षतोडीमुळे आणि दुस-या बाजूला पर्यावरण संरक्षणाच्या मागणीमुळे चर्चेत आहे. ज्यात स्थानिक नागरिक, पर्यावरणप्रेमी आणि प्रशासन यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न सुरू आहे. सांडपाणी प्रक्रिया केंद्रासाठी प्रस्तावित १८२५ झाडे तोडण्यास परवानगी मिळाल्यानंतर पर्यावरणप्रेमींनी याला विरोध केला आहे. याबाबतीत स्थानिक पातळीवर असंतोष आहे आणि पर्यावरणप्रेमींनी उच्च न्यायालयाच्या निकालानंतरही याबाबत प्रश्न विचारले आहेत. 'तपोवन वाचवा' या मोहिमेअंतर्गत पर्यावरणप्रेमींनी बैठका घेऊन प्रशासनाला आव्हान दिले आहे. तज्ज्ञांची समिती नेमणे आणि ऐतिहासिक संदर्भ मिळवणे यांसारख्या मागण्या केल्या जात आहेत. नाशिक महानगरपालिका आयुक्त मनिषा खत्री यांच्याकडे याबाबत विचारणा करण्यात आली आहे. कपिला नदीच्या स्वच्छतेवर आणि पर्यावरणाच्या स्थितीवरही लक्ष दिले जात आहे. या संदर्भात राजकीय नेते आणि प्रशासनासोबतही चर्चा सुरू असून विकासाच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले जात आहे. तपोवन सध्या पर्यावरण संरक्षणाच्या लढाईचे केंद्र बनले आहे, जिथे विकास आणि निसर्गाच्या रक्षणादरम्यान संतुलन साधन्याचे आव्हान असून नागरिक आणि पर्यावरणप्रेमी प्रशासनाकडे पारदर्शकता आणि योग्य कृतीची मागणी करत आहेत. तपोवनातील वृक्षतोड सध्या न्यायालयीन स्थगितीच्या अधीन आहे, पण यावरून पर्यावरण, विकास आणि स्थानिक परंपरा यांच्यातील संघर्ष तीव्र झाला आहे.

**सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली,यवतमाळ, भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९**

## पान १ वरुन

### जालना जिल्ह्यात ...

जिल्ह्यातील ख्रिस्ती समाजाचे गाव म्हणून ओळख असलेल्या बेथलेहेम गावातही नाताळ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. येथे चर्चमध्ये करण्यात आलेली सजावट व विद्युत रोषणाई अत्यंत सुंदर दिसत आहे. प्रभू येशूच्या जन्माचा देखावा (गव्हाणी) खुप मनमोहक पद्धतीने सादर करण्यात आली असून. गव्हाणी बघण्यासाठी या ठिकाणी नागरिकांची गर्दी होत आहे. चर्चवरील विद्युत रोषणाईमुळे संपूर्ण बेथलेहेम गावाचा परिसर प्रकाशाने झगमगत आहे. या सुंदर सजावटीमुळे यंदा बेथलेहेम येथील चर्च परिसर खुप सुंदर दिसत आहे. विशेष आकर्षण असलेल्या प्रभू येशूचा जन्मदेखावा पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी बेथलेहेम गावातील चर्चमध्ये होत आहे. बेथलेहेम येथील नाताळ सजावटीसाठी बाळू गणपत शिंदे यांनी सहकार्य केल्याबद्दल ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले आहेत.

जालना शहरातील टॉम डॉप्सन मेमोरियल चर्च येथे सुध्दा नाताळ निमित्त ख्रिस्त जन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून दि. २६ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता प्रभू येशूच्या जन्मावर आधारित नाटिका सादर करण्यात येणार आहे. ख्रिस्त जन्मोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेले हे कार्यक्रम दि. ३० डिसेंबरपर्यंत चालणार असून दररोज भाविकांसाठी विशेष प्रार्थना, भक्ती, आराधना व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तर दि. २८ रोजी संध्याकाळी ७ वाजता धार्मिक चित्रपट दाखविण्यात येणार आहे तसेच या कार्यक्रमांना जालना शहरासह परिसरातील ख्रिस्ती बांधव व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन टॉम डॉप्सन मेमोरियल चर्चचे रेव्ह.बि.बि.कांबळे, जॉर्ज उगले, मि.आश्विन सिंग,पास्टरेट मेंबर, महिला मंडळ, संडेस्कुल टॉम डॉप्सन चर्च तरुण मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. एकूणच जालना शहरासह संपूर्ण जिल्ह्यात नाताळ शांततेत, प्रेम व बंधुभावाच्या संदेशासह उत्साहात साजरा करण्यात आला.

### भाजपा जिल्हा ...

भारतीय जनता पार्टीचे २८३ व २०१९ मध्ये ३०२ खासदार निवडून आणून पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी अटलजींनी उभारलेल्या पायावर कळस चढवून इतिहास रचला व १९८० च्या पहिल्या अधिवेशनात अटलजींनी केलेली भविष्यवाणी अंधेरा छटेगा सुरज निकलेगा कमल खिलेगा हि पूर्ण केली असे त्यांनी सांगितले.

यावेळी सोपान पेंढारकर, नगरसेवक चंपालाल भगत, ज्ञानेश्वर ढोबळे, जीवन सले, माजी जिल्हा सरचिटणीस देविदास देशमुख, राजेश जोशी, गोवर्धन कोल्हे, जिल्हा उपाध्यक्ष धनराज काबलिये, सिद्धिविनायक मुळे, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, वसंत शिंदे, अरुणाताई जाधव, सखुबाई पणबिसरे, ममता कोंड्याल, वर्षा ठाकूर, वैशाली बनसोडे, दिपाली बिन्नीवाले, स्नेहा जोशी, मंडळ अध्यक्ष सुनील खरे, अमोल धानुरे, संजय डोंगरे, ॲड सतीश तवरावाला, राजेंद्र भोसले, उमेश अग्रवाल, रवी अग्रवाल, सुभाष सले, शिवराज जाधव, बाबुराव भवर, बद्री जांगडे, शाम उगले, सोमेश कबलिये, गणेश जल्लेवार, सिद्धेश्वर हाजबे, आनंद झारकंडे, डोंगरसिंग साबळे, रोहित नलावडे, अमन मित्तल, रामलाल जाधव, रणजीत रीडला, गौरव गोधेकर, प्रवीण मोहता, सुदर्शन काळे, गुलाब पणबिसरे, अनिल संचेती, कृष्णा खिल्लारे, करण झाडीवाले, संजय माधवाले, भगवान चांदोडे, अक्षय जगदाळे, विकास कदम, आकाश सिंग बावरी, सतीश अकोलकर, विशाल उफाड, राजेंद्र जगताप, शिवम ठाकूर आदींसह मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### वेळीच तपासणी ...

पन्नालाल बगडिया व डॉ. राजेश सेठिया यांचा परिचय करून देत त्यांच्या समाजसेवेचा आढावा घेतला. ड. अनिल संचेती यांनी पन्नालाल बगडिया यांचा तर तेरापंथ युवक परिषदेचे परेश धोका यांनी डॉ. राजेश सेठिया यांचा सत्कार केला.निशुल्क थायराइड तपासणी शिबिराचा एकूण ६४ नागरिकांनी लाभ घेतला. आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी व समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत वैद्यकीय सुविधा पोहोचवण्यासाठी असे उपक्रम भविष्यातही सातत्याने राबविले जातील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

### आमदार रोहित पवार मंत्री जयकुमार रावल यांच्या भेटीला

# सोयाबीन नोंदणीला मुदतवाढ आणि तूर खरेदी केंद्र सुरु होणार, नवीन पाच गोदामे

**कर्जत । जामखेड । प्रतिनिधी -** कर्जत-जामखेड मतदारसंघातील विविध प्रश्नांसदर्भात आमदार रोहित पवार यांनी मुंबईत पणनमंत्री जयकुमार रावल यांची भेट घेतली. सोयाबीन व उडीद खरेदी केंद्रातील अडचणी दूर करून तातडीने शासकीय हमीभावाने तूर खरेदी केंद्र सुरु करण्याच्या तसेच सोयाबीन नोंदणीसाठी मुदतवाढ देण्याच्या सूचना यावेळी रावल यांनी दिल्या. तसेच कर्जत-जामखेड मतदारसंघात नवीन पाच गोदामे उभारण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे आदेशही त्यांनी दिले आहे.

नुकत्याच झालेल्या नगरपरिषदेच्या निवडणुकीत आमदार रोहित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाला जामखेडमध्ये यश मिळाले नाही. परंतु या अपयशाला झटकून टाकत आमदार रोहित पवार हे पुन्हा एकदा जोमाने कामाला लागल्याचे दिसत आहे. बुधवारी त्यांनी मुंबईत पणनमंत्री जयकुमार रावल यांची भेट घेऊन उडीद आणि सोयाबीन खरेदी केंद्रातील अडचणी त्यांच्याकडे मांडल्या. तसेच मंगळवारी जामखेडमध्ये विविध मागण्यांसंदर्भात शेतकऱ्यांनी काढलेल्या आक्रोश मोर्चाची माहितीही त्यांनी मंत्री रावल यांना दिली.

खरीप हंगामाच्या अखेरच्या टप्प्यात राज्यात झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. उडीद, सोयाबीन आणि तुरीचे थोडेफार पीक शेतकऱ्यांच्या हाती लागले असून सध्या राज्यात अनेक ठिकाणी उडीद आणि सोयाबीनची शासकीय दराने खरेदी करण्यासाठी शासकीय खरेदी केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. मात्र या खरेदी केंद्रांवर अनेक अडचणी असल्याने ही खरेदी केंद्रे असून अडचण अन् नसून खोळंबा अशी शेतकऱ्यांची अवस्था झाली आहे. अतिवृष्टीने जे काही थोडेफार पीक शेतकऱ्यांच्या हाती आले त्याची गुणवत्ता ढासळली आहे. तसेच यंदा पाऊस लवकर झाल्याने उडदाची पेरणीही लवकर झाली परिणामी एक महिना आधी उडीद तयार झाला, पण खरेदी मात्र उशिरा सुरु झाली. त्यासाठीही अनेकदा पाठपुरावा करावा लागला. शिवाय उशिरा खरेदी सुरु झाल्यानेही त्याचा विपरित परिणाम उडदाच्या गुणवत्तेवर झाला आहे. कर्जत तालुक्यात मुळेवाडी, टाकळी खंडेश्वरी आणि कोपर्डी या तीन ठिकाणी तसेच जामखेडमध्येही काही ठिकाणी उडीद खरेदी केंद्र सुरु झाले असले तरी व्रिकीसाठी आणलेला उडीद आतून पिवळसर निघत असून बुरशीचेही प्रमाण असल्याने असा उडीद गोडाऊनमध्ये स्वीकारला जात नाही. त्यामुळे या उडदाची खरेदी पूर्णपणे बंद आहे, ही बाब आमदार रोहित पवार यांनी मंत्र्यांना सांगितली आणि कोणतीही अट न घालता या उडदाची खरेदी करण्याची मागणी केली.

जामखेडमध्ये खर्डा, साकत, शिऊर, दिघोळ या भागात मोठ्या प्रमाणात सोयाबीनचे पीक घेतले जाते. परंतु अतिवृष्टीमुळे सोयाबीनचीही गुणवत्ता ढासळली असून त्यात काडीकचऱ्याचे प्रमाण आढळून येते. त्यामुळे वखार महामंडळाच्या गोदामातील ग्रेडर हा शेतमाल नाकारत असल्याने हमीभाव खरेदी केंद्रावरील सोयाबीन खरेदी न करता परत पाठवले जाते. यामुळे शेतकऱ्यांना वाहतुकीचाही नाहक भुर्दंड सहन करावा लागतो शिवाय एकदा नाकारलेले सोयाबीन शेतकऱ्यांना कवडीमोल भावाने खासगी व्यापाऱ्यांना विकावे लागते. त्यामुळे हमीभाव खरेदी केंद्रावर सोयाबीनची खरेदी करताना अटीतटीचे बंधन घालू नये आणि सोयाबीन खरेदीची नोंदणी ३१ डिसेंबरपर्यंत असून त्यालाही मुदतवाढ देण्याची मागणी आमदार रोहित पवार यांनी केली. याबाबतही रावल यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

सध्या सगळीकडे तूर पिकाची काढणी सुरु असून काही शेतकऱ्यांचा मालही तयार झाला आहे. परंतु तुरीची खरेदी केंद्रे अद्याप सुरु करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे तूर उत्पादक शेतकऱ्यांनाही खासगी व्यापाऱ्यांना कवडीमोल भावात तूर विकावी लागत आहे. त्यामुळे तूर पिकासाठी तातडीने ऑनलाइन नोंदणी सुरु करुन हमीभावाने खरेदी केंद्रेही तत्काळ सुरु करावीत आणि शेतकऱ्यांची कोणत्याही प्रकारे आर्थिक लूट न करता सर्व हमीभाव खरेदी केंद्रांवर शासनाच्या नियमांनुसारच हमाली व इतर खर्च आकारण्यात यावा, अशीही मागणी केली.

> आमदार रोहित पवार यांनी महाविकास आघाडी सरकारच्या काळात खर्डा आणि मिरजगाव येथे ३ हजार मे. टन क्षमतेच्या दोन गोदामांची उभारणी केली. ही दोन्ही गोदामे सध्या भरली असून यामुळे नव्याने सोयाबीन आणि उडीद खरेदी करण्यात अडचणी येत आहेत. अशी अडचण पुन्हा येऊ नये आणि शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून खर्डा आणि मिरजगाव या ठिकाणी आणखी प्रत्येकी एक तसेच जामखेड शहर, राशीन आणि नान्नज या ठिकाणीही प्रत्येकी एक असे एकूण पाच गोडावून मंजूर करण्याची मागणीही आमदार रोहित पवार यांनी केली. त्यावर याबाबतचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याचा आदेश मंत्री रावल यांनी वखार महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांना दिला आहे.



## पोस्को कंपनीच्या 'बेटी बचाओ बेटी पढाओ' अभियानातून शंभर पात्र लाभार्थी मुलींना लाभ




**बोरघर । माणगाव । प्रतिनिधी-** औद्योगिक क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने आपल्या सामाजिक उत्तरदायित्व (CSR) निधीतून ग्रामीण भागातील मुलींच्या उज्वल भविष्यासाठी एक आश्वासक पाऊल उचलले आहे. केंद्र सरकारच्या 'बेटी बचाओ बेटी पढाओ' या योजनेला बळ देत कंपनीने भागाड ग्रामपंचायत हद्दीतील प्रत्येक पात्र बालिकेच्या नावे ५०,००० रुपयांची मुदत ठेव करण्याचा उपक्रम यशस्वीपणे राबवला आहे. सन २०१७ पासून सुरु असलेल्या या उपक्रमाद्वारे आत्तापर्यंत १०० मुलींना या योजनेचा लाभ मिळाला आहे.

या योजनेचे मुख्य वैशिट्य म्हणजे, ही ५०,००० रुपयांची ठेव मुलगी १८ वर्षाची होईपर्यंत सुरक्षित राहते व १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर व्याजासह मिळणारी ती रक्कम मुलीला तिचे उच्च शिक्षण किंवा व्यावसायिक प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी उपयोगात येते. आर्थिक टंचाईळे ग्रामीण भागातील मुलींचे शिक्षण अपूर्ण राहू नये हा या मागचा मुख्य उद्देश आहे. दिनांक १६ डिसेंबर २०२५ रोजी भागाड ग्रामपंचायत कार्यालयात पार पडलेल्या या कार्यक्रमात २०२४ मध्ये जन्मलेल्या ५ मुलींना मान्यवरांच्या हस्ते मुदत ठेव प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी माणगावच्या गटविकास अधिकारी शुभदा पाटीलयांनी कंपनीच्या विविध उपक्रमाचे कौतुक केले. त्या म्हणाल्या, पोस्को कंपनीने केवळ उद्योग उभारला नाही तर इथल्या समाजाशी नाते जोडून मुलींच्या जन्माचे स्वागत करण्याची संस्कृती रुजवली आहे. अश्या उपक्रमांमुळेच ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होत आहे. कार्यक्रमावेळी पोस्को महाराष्ट्र स्टीलचे वरिष्ठ अधिकारी श्री. जी युन पार्क यांनी कंपनीची भूमिका स्पष्ट केली. त्यांनी सांगितले मुलींचे सक्षमीकरण हा केवळ एका कुटुंबाचा नव्हे तर संपूर्ण राष्ट्राच्या विकासाचा पाया आहे. हा उपक्रम खरोखरच खास आहे, कारण तो भारत सरकारच्या बेटी बचाओ, बेटी पढाओ योजनेशी सुसंगत आहे, जो लिंग समानता आणि मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देतो. आम्ही स्थानिक समुदायांना त्यांच्या पायावर उभे करण्याकरिता प्रयत्न करत आहोत आणि भविष्यातही आमचा हा प्रयत्न अधिक व्यापाक स्वरुपात सुरु राहील.

या कार्यक्रमाला पोस्कोचे वरिष्ठ अधिकारी,गटविकास अधिकारी माणगाव,भागाड ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच, उपरपंच, सदस्य, पदाधिकारी, मुलींचे पालक आदी उपस्थित होते. हा उपक्रम ही केवळ आर्थिक मदत नसून ग्रामीण भागातील मुलींना स्वप्न पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची संधी देणारा ठरला आहे.



## जालना महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजपा-राष्ट्रवादीत सकारात्मक चर्चा



**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी व राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांच्यात युती संदर्भात चर्चा पार पडली व विविध मुद्द्यांवर विचारविनिमय करण्यात आला. या चर्चेदरम्यान माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री व आ. बबनराव लोणीकर, आ. संतोष पाटील दानवे, जालना महानगरपालिका निवडणूक प्रमुख कैलासजी गोरंट्याल, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते अरविंद चव्हाण, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, अशोक पांगारकर, धनराज काबलीये आदी मान्यवरांची उपस्थिती होती.



**भोकरदन नगर परिषद निवडनुकीत शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख भुषन शर्मा प्रचंड मतांनी निवडुन आल्याबद्दल आमदार अर्जुन खोतकर यांच्या निवासस्थानी सत्कार करन्यात आला यावेळी जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहर प्रमुख विष्णू पाचफुले, प्रविन फुके पाटील, शुभम टेकाळे, महादु गिते, भगवानराव मदन, ईश्वर जुंबड यांची उपस्थिती होती.**

## भ्रष्टाचाराला सेवानिवृत्तीनंतरही अभय नाही! अलाहाबाद उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय; महाराष्ट्रातही होणार दूरगामी परिणाम

# सार्वजनिक सेवेतील उत्तरदायित्वाचा मोठा विजय आहे. - महेश धन्नावत

**प्रयागराज । जालना -** शासकीय विभागांमध्ये विशिष्ट हेतुसाठी किंवा पक्षपातीपणा करण्यासाठी वाढत्या भ्रष्ट प्रथांना आळा घालण्यासाठी, सेवानिवृत्त झालेल्या व्यक्तीलाही कोणतीही सूट दिली जाऊ नये, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण अलाहाबाद उच्च न्यायालयाने नुकतेच नोंदवले आहे. न्यायमूर्ती मंजू राणी चौहान यांच्या खंडपीठाने एका सेवानिवृत्त तांत्रिक कनिष्ठ अभियंत्याने दाखल केलेली रिट याचिका फेटाळताना हे निरीक्षण नोंदवले. या अभियंत्याने त्याच्या सेवानिवृत्तीनंतर एका विद्यमान आमदाराच्या नातेवाईकाने केलेल्या तक्रारीच्या आधारे सुरू झालेल्या चौकशीला आव्हान दिले होते.

याचिकाकर्ते, विपिन चंद्र वर्मा, ३० जून २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले होते. त्यांनी उच्च न्यायालयात असा युक्तिवाद केला की, २०१५ ते २०२२ या कालावधीत कर्तव्यात झालेल्या विविध कथित अनियमिततांच्या संदर्भात सप्टेंबर २०२५ मध्ये त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचा अधिकाऱ्यांना कोणताही अधिकार नाही. ही नोटीस एप्रिल २०२५ मध्ये विधानसभा अध्यक्षांकडे तक्रार दाखल झाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश दिल्यानंतर बजावण्यात आली होती.

याचिकाकर्त्याच्या वतीने युक्तिवाद करताना, ज्येष्ठ वकील प्रभाकर अवस्थी यांनी सांगितले की ही तक्रार राजकीय हेतूने प्रेरित होती आणि तक्रार दाखल करताना लोकप्रतिनिधींच्या तक्रारींवर सुनावणी करण्याच्या प्रक्रियेसाठी असलेल्या नियमांकडे उत्तर प्रदेश विधानसभा कार्यपद्धती आणि कामकाज नियम, १९५८ दुर्लक्ष केले गेले. त्यांनी ठामपणे सांगितले की, याचिकाकर्ते जूनमध्ये निवृत्त झाल्यामुळे, आता नियोक्ता-कर्मचारी संबंध संपुष्टात आले आहेत आणि त्यामुळे अशी नोटीस देणे बेकायदेशीर आहे.

त्यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, नागरी सेवा नियमावलीतील नियम ३५१-अ नुसार, कोणत्याही सेवानिवृत्त अधिकाऱ्यावर अशा घटनांसाठी * कारवाई करता येत नाही, ज्या घटना कारवाई सुरू होण्याच्या चार वर्षांपेक्षा जास्त जुन्या आहेत. चौकशीचा कालावधी २०१५ ते २०२२ पर्यंतचा असल्याने, ही नोटीस मुदतबाह्य होती, असा त्यांचा दावा होता.

**न्यायालयाचे निरीक्षण आणि निर्णय**

राज्याच्या वतीने मुख्य स्थायी वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, २३ ऑगस्ट २०२५ रोजीच्या चौकशी अहवालात, विशेषतः २०२२ सालाशी संबंधित अनियमितता आढळून आली होती. २०२२ मधील ही घटना चार वर्षांच्या मर्यादेत येत असल्याने, नियम ३५१-अ अंतर्गत कारवाईवर बंधन येत असल्याचा याचिकाकर्त्याचा युक्तिवाद न्यायालयाने फेटाळून लावला.

न्यायालयाने असेही निरीक्षण नोंदवले की, सरकारी कर्मचारी केवळ पगार मिळवण्यासाठी कर्तव्य बजावत नाही, तर तो राष्ट्र उभारणीत योगदान देतो आणि त्यामुळे त्याच्यावर उच्च जबाबदारी असते. सेवेत असलेल्या किंवा सेवानिवृत्त झालेल्या सरकारी कर्मचाऱ्याने कर्तव्यात केलेली कोणतीही चूक उघडकीस आणण्याचा अधिकार जनतेला किंवा त्यांच्या प्रतिनिधींना असला पाहिजे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

ही तक्रार राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा याचिकाकर्त्याचा युक्तिवादही उच्च न्यायालयाने फेटाळून लावला. न्यायालयाने नमूद केले की, लोकप्रतिनिधी (या प्रकरणात आमदार) समाजात महत्त्वाची भूमिका बजावतात आणि त्यांना जमिनीस्तरावरील लोकांच्या अनेक तक्रारींचा अनुभव असतो. प्रत्येक तक्रारीला राजकीय हेतूने प्रेरित म्हणता येणार नाही, असे न्यायालयाने म्हटले.

केवळ कारणे दाखवा नोटीस बजावली असल्याने आणि त्यावर उत्तर मागितले असल्याने, या टप्प्यावर कोणतेही कायदेशीर नुकसान झालेले नाही, त्यामुळे रिट याचिका दाखल करण्यायोग्य नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. अखेरीस, न्यायालयाने याचिका फेटाळून लावली आणि याचिकाकर्त्याला चौकशीत सहकार्य करण्याचे आणि सेवानिवृत्त सरकारी कर्मचाऱ्याला लागू असलेल्या नियमांचे पालन करण्याचे निर्देश दिले.

**महाराष्ट्रासाठी या निकालाचे महत्त्व**

अलाहाबाद उच्च न्यायालयाचा हा निर्णय उत्तर प्रदेशापुरता मर्यादित असला तरी, त्याचे पडसाद महाराष्ट्रातही उमटण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातही सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांवरील विभागीय चौकशीसाठी समान कायदेशीर तरतुदी आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम २७ हा सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांवरील विभागीय कारवाईसंदर्भात आहे.

नियम २७(२)(ब)(ळळ) नुसार, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यावर कोणतीही विभागीय कारवाई अशा घटनेसाठी सुरू केली जाऊ शकत नाही, जी कारवाई सुरू होण्याच्या तारखेच्या चार वर्षांपूर्वी घडली असेल. ही तरतूद उत्तर प्रदेशातील नियम ३५१-अ सारखीच आहे.

या नियमामुळे भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या अनेक अधिकाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर कायदेशीर कारवाईतून सूट मिळत असे.

अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेला निकाल हा अशा प्रकरणांमध्ये एक महत्त्वाचा न्यायिक दृष्टिकोन सादर करतो. जरी हे प्रकरण महाराष्ट्रातील नसले तरी, मुंबई उच्च न्यायालयात किंवा महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणासमोर अशा प्रकारची प्रकरणे आल्यास, अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या या तर्काचा आणि निरीक्षणांचा संदर्भ निश्चितपणे दिला जाईल. सार्वजनिक पैशाचा गैरवापर आणि भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये, केवळ तांत्रिक किंवा मुदतीच्या कारणास्तव कोणालाही अभय देऊ नये, हा या निकालाचा गाभा आहे. त्यामुळे, महाराष्ट्रातील शासकीय कर्मचाऱ्यांनीही सेवानिवृत्तीनंतर आपण केलेल्या कामांसाठी जबाबदार आहोत, ही बाब लक्षात घेणे आवश्यक आहे.

अलाहाबाद उच्च न्यायालयाचा हा निर्णय केवळ उत्तर प्रदेशापुरता मर्यादित नसून, त्याचे दूरगामी परिणाम संपूर्ण देशात दिसणार. महाराष्ट्रात अनेकदा सेवानिवृत्त अधिकाऱ्यांवरील भ्रष्टाचाराच्या चौकशा विविध कारणांमुळे रखडतात किंवा कायद्याच्या पळवाटा शोधून त्यातून सुटका मिळवण्याचे प्रयत्न होतात.

जालना जिल्ह्याच्या संदर्भात बोलायचे झाल्यास, येथे अनेक विकासकामे आणि शासकीय योजनांमध्ये अनियमितता झाल्याच्या तक्रारी वेळोवेळी समोर येतात. अनेकदा संबंधित अधिकारी सेवानिवृत्त होईपर्यंत चौकशी पूर्ण होत नाही. अशा प्रकरणांमध्ये, हा निकाल एक महत्त्वाचा कायदेशीर आधार ठरू शकतो. या निर्णयामुळे, सेवानिवृत्तीनंतरही भ्रष्ट अधिकाऱ्यांना चौकशीला सामोरे जावे लागेल आणि त्यांच्यावर कारवाई करणे शक्य होईल. यामुळे प्रशासकीय कामकाजात अधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व येण्यास मदत होईल. यापुढे 'सेवानिवृत्त झालो म्हणजे सुटलो' ही मानसिकता बाळगणाऱ्या भ्रष्ट अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कायद्याचा वचक निर्माण होईल.

# दरगाह राजाबाग येथे तीन दिवसीय उर्स महोत्सव

## सुन्नी इज्तेमा व दस्तारबंदीत देशभरातील नामवंत उलेमांची उपस्थिती

**जालना । प्रतिनिधी-** जालना शहरातील ऐतिहासिक दरगाह राजाबाग शेर सवार येथे सूफी संत हजरत सैयद अहमद शेर सवार (रहमतुल्लाह अलैह) यांचा ७४८ वा उर्स-ए-मुबारक मोठ्या भक्तिभावात साजरा होणार आहे. उर्सनिमित्त दि. २७ डिसेंबर २०२५ (शनिवार) पासून तीन दिवसीय विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

हा उर्स दरगाहचे इनामदार व मुतवल्ली सैयद जमील अहमद कादरी रझवी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार असून, यामध्ये सुन्नी इज्तेमा, दस्तारबंदी, कुरआन ख्वानी, झिक्र-ए-ख्वाजगान, नातिया मुशायरा, चादरपोशी, क़ुल शरीफ तसेच तबर्रुक़ात दर्शन यांसारखे महत्त्वाचे धार्मिक उपक्रम होणार आहेत.

**पहिला दिवस - शनिवार, २७ डिसेंबर** उर्सची सुरुवात सकाळी १० वाजता खतम-ए-ख्वाजगानने होईल. जुहर नमाजीनंतर कुरआन ख्वानी, तर अस्रनंतर सिलसिला-ए-कादरिया झिक्र-ए-ख्वाजगान होईल. यानंतर नूरी महफिल आयोजित करण्यात येणार असून त्यात नात व मनकबत सादर केली जाणार आहे. मगरिब नमाजीनंतर क़ुल शरीफ व चादरपोशीचा कार्यक्रम पार पडेल. दरगाह ट्रस्टच्या वतीने भाविकांसाठी गरीब नवाज लंगरची व्यवस्था करण्यात आली आहे.

इशा नमाजीनंतर दारुल उलूम कादरी अनवार-ए-रझाच्या विद्यार्थ्यांचे तालीमी प्रदर्शन व त्यानंतर बज्म-ए-नात-ए-रसूल आयोजित करण्यात येणार आहे. यावेळी प्रसिद्ध नातख्वां मौलाना अहमद रझा मिस्बाही उर्फ नूरी मियाँ नात व मनकबत सादर करतील.

**दुसरा दिवस - रविवार, २८ डिसेंबर** या दिवशी मगरिबपासून रात्री १२ वाजेपर्यंत केवळ पुरुष भाविकांसाठी मुकद्दस तबर्रुक़ात दर्शन ठेवण्यात आले आहे. यामध्ये हजरत मुहम्मद ﷺ यांचे मुए-मुबारक, गिलाफ-ए-काबा शरीफ, गिलाफ-ए-मजार-ए-अकदस, गुम्बद-ए-ख़ज़रा येथील मातीपासून बनवलेली मोहर-ए-नबूवत, काबा शरीफच्या आतील संगमरवरी फरशीचा तुकडा तसेच हजरत शेर सवार (र.अ.) यांच्याशी संबंधित अन्य तबर्रुक़ातांचा समावेश आहे.



इशा नमाजीनंतर भव्य सुन्नी इज्तेमा व दस्तारबंदी सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या इज्तेमालाचे नेतृत्व हजरत अल्लामा सैयद मुईनुद्दीन अशरफ अशरफी जिलानी (सज्जादानशीन, किछौछा शरीफ) करतील, तर अध्यक्षस्थान कायद-ए-मिल्लत हाजी मौलाना सईद नूरी (अध्यक्ष, रझा अकादमी मुंबई) भूषवतील.

यावेळी दारुल उलूम गुलशन-ए-कादरी अनवार-ए-रझाच्या विद्यार्थ्यांची दस्तारबंदी करण्यात येणार आहे. इज्तेमामध्ये प्रमुख वक्ते म्हणून अल्लामा सैयद शाह नूर मियाँ अशरफी (राजस्थान) अल्लामा मुफ्ती मोहम्मद शाहनवाज आलम मिस्बाही (उत्तर प्रदेश) यांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाचे संचालन हाफिज व कारी मोहम्मद रमजान अली सुल्तानी (बिहार) करतील.

दि. २७ व २८ डिसेंबर रोजी दरगाह शरीफमध्ये महिलांचा प्रवेश प्रतिबंधित राहणार आहे. तीन दिवसीय उर्सचा समारोप दि. २९ डिसेंबर २०२५ (सोमवार) रोजी फातेहा ख्वानीने होणार आहे.

दरगाहचे मुतवल्ली सैयद जमील अहमद यांनी उर्स, सुन्नी इज्तेमा व दस्तारबंदी कार्यक्रमास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन भाविकांना केले आहे. उर्स यशस्वी करण्यासाठी दारुल उलूम गुलशन-ए-कादरी अनवार-ए-रझाचे उस्ताद, रझा अकादमीचे पदाधिकारी तसेच विविध धार्मिक संघटनांचे कार्यकर्ते परिश्रम घेत असल्याची माहिती ॲड. फिरोज बागबान यांनी दिली.

मुक्त विद्यापीठ - राष्ट्रीय पुस्तक न्यासचा संयुक्त उपक्रम

## नाशिकमध्ये तीन दिवसीय 'अनुवाद कार्यशाळे'चे आयोजन

**नाशिक । प्रतिनिधी -** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, भाषा अनुवाद केंद्र आणि नवी दिल्लीतील राष्ट्रीय पुस्तक न्यास (एनबीटी - नॅशनल बुक ट्रस्ट), भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय विशेष 'अनुवाद कार्यशाळे'चे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठ मुख्यालयात शुक्रवार दिनांक २६ डिसेंबर ते रविवार २८ डिसेंबर २०२५ या कालावधीत ही कार्यशाळा होईल.

विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतीतील सभागृहात या कार्यशाळेचे उद्घाटन शुक्रवारी सकाळी प्रसिद्ध अनुवादक उमा कुलकर्णी यांच्या हस्ते होईल. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ विद्वत परिषद सदस्य श्री. राजेश पांडे, राष्ट्रीय पुस्तक न्यासचे अध्यक्ष श्री. मिलिंद मराठे, विद्यापीठाचे कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे उपस्थित राहणार आहेत. तीन दिवसांच्या या कार्यशाळेत पहिल्या दिवशी डॉ. चंद्रकांत पाटील यांचे बीजभाषण होईल. त्यानंतर डॉ. गोरख थोरात ('भाषांतर स्वरूप आणि प्रकार' - हिंदी-मराठी भाषांतर), डॉ. दिलीप धोंडगे (अर्वाचिनीकरण व सुलभीकरण) या विषयावर मार्गदर्शन करतील. शनिवारी दुसऱ्या दिवशी सकाळी प्रथम सत्रात 'अनुवादकाचे अनुभव व समस्या' या विषयावरील चर्चासत्रात सुप्रसिद्ध अनुवादक अपर्णा वेलणकर, ड. अभय सदावर्ते आणि कृष्णा किंबहुने मतप्रदर्शन करतील. द्वितीय सत्रात डॉ. रमेश वरखेडे 'समाजभाषा आणि अनुवाद' या विषयावर भाष्य करतील. दोन्ही दिवशी तृतीय सत्रात कृतिसत्र होईल. त्यात डॉ. मंगला वरखेडे, डॉ. राजेंद्र कुंभार, श्री. चंद्रकांत भोंजाळ, श्री. प्रफुल्ल शिलेदार, डॉ.अश्विन किनारकर, डॉ. गिरीश पिंपळे, डॉ. विद्या सुर्वे व कु. शीतल कोकाटे यांचा प्रमुख सहभाग असेल. ज्येष्ठ लेखक व समीक्षक डॉ. सुनील कुमार लवटे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यशाळेचा समारोप रविवार दिनांक २८ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता होईल. डॉ. रमेश वरखेडे अध्यक्षस्थानी तर डॉ. दिलीप धोंडगे आणि विद्यापीठ विद्वत परिषद सदस्य प्राचार्य डॉ. संजय चाकणे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. विद्यापीठ ज्ञानस्त्रोत केंद्र तथा भाषा अनुवाद केंद्राचे प्रमुख डॉ. प्रकाश बर्वे कार्यशाळेचे समन्वयक आहेत. मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांची टिप्पणी - कुठल्याही भाषेचे संवर्धन, विकास, प्रचार व प्रसार करणे यात अनुवाद व पर्यायाने अनुवादकाचे महत्व अनन्यसाधारण आहे. तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता यामुळे अनुवाद करणे सहज सोपे वाटत असले तरी मानवी भाव - भावना, संवेदना व विषयाचा विस्तार आणि खोली यातील सहज आणि कार्यकारणभाव जोडण्याचे व ते समजावून सांगण्याचे कार्य केवळ एक उत्तम अनुवादकच करू शकतो. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात स्वतंत्ररीत्या भाषा अनुवाद केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे. त्यामुळे अभिजात असलेल्या मराठी भाषेच्या विकास - संवर्धनासाठी ही कार्यशाळा एक सकारात्मक पाऊल व अनुवादकांची मजबूत साखळी उभारण्याचे कार्य करेल असा विश्वास वाटतो.

# पिंपरी चिंचवड महापालिकेच्या संदर्भात दोन्ही राष्ट्रवादीची गुप्त बैठक

**पुणे -** राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचे बिगुल वाजलं आहे. येत्या १५ जानेवारीला महापालिका निवडणुकांसाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. शिवसेना ठाकरे गट आणि मनसेची या निवडणुकांसाठी युतीची घोषणा झाली आहे. भाजप आणि शिवसेना शिंदे गट यांच्या देखील युतीसंदर्भात चर्चा सुरु आहे. तसेच दोन्ही राष्ट्रवादीची देखील एकत्र निवडणूक लढवण्यासंदर्भात चर्चा सुरु आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसंदर्भात महत्वाची अपडेट समोर आली आहे. पिंपरीत दोन्ही राष्ट्रवादीची गुप्त बैठक पार पडली आहे. शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे आणि आमदार रोहित पवार बैठकीला हजर होते. आज रात्रीच ते अजित पवार यांच्याशी चर्चा करणार असल्याची माहिती मिळत आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या संदर्भात दोन्ही राष्ट्रवादीची गुप्त बैठक पार पडली आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे खासदार अमोल कोल्हे, आमदार रोहित पवार आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे अजित गव्हाणे यांच्यात चर्चा झाली आहे. एक तास झालेल्या बैठकीत जागा वाटपावर बरीच घासाघीस झाली आहे. अजित पवारांच्या इच्छुक उमेदवारांच्या जागी शरद पवारांच्या इच्छुकांनींही दावा केला आहे. या ठिकाणी नेमके कोणाचे उमेदवार द्यायचे तसेच महाविकास आघाडीतील घटक पक्षांना सोबत घ्यायचं का? यावर बरीच खलबते रंगली आहेत. अमोल कोल्हे आणि रोहित पवार उपमुख्यमंत्री अजित पवारांशी संवाद साधणार दरम्यान, या बैठकीनंतर अमोल कोल्हे आणि रोहित पवार यांनी नो कमेंट्स म्हणत थेट पुणे गाठलं आहे. आता पुण्यात हे दोघे उपमुख्यमंत्री अजित पवारांशी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या अनुषंगाने संवाद साधणार आहेत, अशी माहिती अजित पवार गटाकडून बैठकीत उपस्थित असलेल्या अजित गव्हाणे यांनी दिली आहे. ठाणे महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट यांच्यात आघाडी होण्याची शक्यता असल्याचे कळते आहे. भाजप आणि शिवसेना शिंदे गट यांच्या देखील युतीसंदर्भात चर्चा सुरु आहे. दरम्यान, अशातच ठाणे महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट यांच्यात आघाडी होण्याची शक्यता आहे. कारण, अजित पवार गटाच्या प्रस्तावावर शरद पवार गटाचे देखील सकारात्मक उत्तर आले आहे. ठाण्यातील शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान यांचा देखील राष्ट्रवादीच्या युतीला होकार आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.